महाराष्ट्र शासन

# डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी, नांदेड.

## DR.SHANKARRAO CHAVAN GOVT.MEDICAL COLLEGE , VISHNUPURI, NANDED.

dean chember - (02462) 229275 fax no. 02462 – 229336 e-mail "gmcnanded @ rediff mail.com."

जा.क्र.डॉशंचशावैमविनां/आस्था-१/जाहीरात/ 8876 /२०२३ दि. 12 / 10 / २०२३

प्रति,

मा.जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी,
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
नांदेङ

विषय:- प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक ( चिकित्सालयीन विषय ) या पदासाठी करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत.

संदर्भ:- मा.संचालनालय,मुंबई यांचे अतिमहत्वाचे पत्र क्र.संवैशिवसंमुं/जाहिरात/करार/क१/२५९३ /२०२३ दि.२५/०८/२०२३

संचालनालय,वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नांदेड यांच्या आस्थापनेवरील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक ( चिकीत्सालयीन ) ही पदे करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत या पत्रासोबत जोडण्यात येत असलेली जाहीरातीची सूचना जास्त खप असलेल्या जिल्हास्तरीय अग्रगण्य वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १ | कार्यालयाचे नांव दुरध्वनी व ई-मेल पत्ता | संस्थेचे नांव व पत्ता:- डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,विष्णूपूरी नांदेङ-४३१६०६<br>दुरध्वनी क्र.०२४६२ -२२९२७४<br>email:-gmcnanded@rediffmail.com |
| २ | जाहीरातीची सूचना प्रसिध्द करण्याची अंतिम तारीख | दिनांक:-१६/१०/२०२३ |
| ३ | प्रसिध्दीचे स्वरुप | जिल्हास्तरीय वृत्तपत्र किमान एक मराठी दैनिकातून एकदा |
| ४ | प्रसिध्दी करिता शिफारस करण्यात आलेले वृत्तपत्र | जास्त खप असलेल्या जिल्हास्तरीय अग्रगण्य एक मराठी वर्तमानपत्रामध्ये, |
| ५ | किती वेळा प्रसिध्द करावयाची आहे | एक वेळ |
| ६ | देयक प्रदान करण्याकरीता कोणत्या नावाने पाठविण्यात यावे. | संस्थेचे नांव:- अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,विष्णूपूरी नांदेड |

सोबत:- जाहीरातीची सुचना

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णूपूरी,नांदेड.

महाराष्ट्र शासन

# डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी, नांदेड.

DR.SHANKARRAO CHAVAN GOVT.MEDICAL COLLEGE , VISHNUPURI, NANDED.

Dean Chember - (02462) 229275 Fax No. 02462 – 229336 E-Mail "gmcnanded @ rediff mail.com."

जा.क्र.डॉशंचशावैमविनां/आस्था-१/जाहीरात/ 8877 /२०२३ दि. 12 / 10 /२०२३

## :: जाहीरातीची सूचना ::

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नांदेड यांच्या आस्थापनेवर वैद्यकीय अध्यापन व रुग्णसेवा या करिता चिकित्सालयीन विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करार पध्दतीने नियुक्तीसाठी त्या त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांबरोबरच कोणत्याही वयोगटाचे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहीत केलेल्या आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवारांना करार पध्दतीने नियुक्ती देण्यासाठी संचालनालयाच्या www.med-edu.nic या संकेतस्थळावर दि.१६/१०/२०२३ रोजी सविस्तर जाहीरात प्रसिध्दकरण्यात येत आहे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णूपूरी,नांदेड

महाराष्ट्र शासन

# डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी, नांदेड.

**DR.SHANKARRAO CHAVAN GOVT.MEDICAL COLLEGE , VISHNUPURI, NANDED.**


Dean Chember - (02462) 229275 Fax No. 02462 – 229336 E-Mail "gmcnanded @ rediff mail.com."


जा.क्र.डॉशंचशावैमविनां/आस्था-१/जाहीरात-प्रसिध्दी/अध्यापक/चिकीत्सा/ 8878 /२०२३ दि. 12 / 10 / २०२३

## :: जाहीरात ::

विषय :- वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नांदेड येथील चिकित्सालयीन विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे मध्यवर्ती निवड प्रक्रियेमार्फत करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत.

संदर्भ:- १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३,दि.१७/१२/*२०१६
२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,शासन निर्णय क्रमांक:एलईसी-२०२१/ प्र.क्र.१९९/ वैसेवा-३, दि.०९/०२/२०२२

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नांदेड येथील चिकीत्सालयीन विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापकया संवर्गातील रिक्त असलेली पदे संस्थास्तरावरुन करार तत्वावर ३६४ दिवसांकरीता तात्पुरत्या नियुक्तीने भरण्या करीता इच्छुक पात्र उमेदवाराकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

इच्छुक पात्र उमेदाराकडून मागविण्यात येत असलेले अर्ज संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या WWW.MED-EDU.IN या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते दि. १६/ १० /२०२३ ते दि. २७ / १० / २०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (शासकीय सुटटी वगळून) अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारले जातील उमेदवाराने शैक्षणिक अर्हता, अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत ऑनलाईन UPLOAD करणे अनिवार्य राहील.अर्ज करण्यासाठी लिंक **www.med-edu.in** वर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.तसेच मुलाखतीचा दिनांक तसेच नियुक्तीबाबतची माहीती संचालनालयाच्या संकेत स्थहावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

(डॉ. एस. आर. वाकोडे)
अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णूपूरी, नांदेड

## डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,विष्णूपूरी,नांदेड

रिक्त पदांचा तपशील

संवर्ग:- प्राध्यापक

| अ.क्र. | विषयाचे नांव | रिक्त पद संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| ०१ | नेत्रशल्यचिकीत्साशास्त्र | ०१ | M.S. (OPHTHALMOLGY) / DNB (OPHTHALMOLGY) | AS PER NOTIFICATION १४. ०२ .२०२३<br>I) ASSOCIATE PROFESSOR IN THE SUBJECT FOR ३ YEARS IN A PERMITTED/APPROVED/RECOGNIZED MEDICAL COLLEGE/INSTITUTION<br><br>II) SHOULD HAVE ATLEAST FOUR RESEARCH PUBLICATIONS (AT LEAST TWO AS ASSOCIATE PROFESSOR) (ONLY ORIGINAL PAPERS, META -ANALYSIS, SYSTEMATIC REVIEWS AND CASE SERIES THAT ARE PUBLISHED IN JOURNALS IMDEXED IN MEDLINE, PUBMED CENTRAL, CITATION INDEX, EXPANDED EMBASE, SCOPUS, DIRECTORY OF OPEN EXCESS JOURNALS (DOAJ) WILL BE CONSIDERED ) THE AUTHOR MUST BE AMONGST FIRST THREE OR SHOULD BE THE CORRESPONDING AUTHOR.<br><br>III) SHOULD HAVE COMPLETED THE BASIC COURSE IN BIOMEDICAL RESEARCH FROM INSTITUTION (S) DESIGNATED BY NMC. |
| ०२ | क्ष- किरण शास्त्र | ०१ | M.D. (RADIO-DIAGNOSIS)/ M.D. ( RADIOLOGY ) DNB (RADIOLOGY) | |
| ०३ | दंत शल्यचिकीत्साशास्त्र | ०१ | M.D.S. | |
| | एकुण | ०३ | | |

# डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,विष्णूपूरी,नांदेड

रिक्त पदांचा तपशिल

संवर्ग:- सहयोगी प्राध्यापक

| अ.क्र. | विषयाचे नांव | रिक्त पद संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| ०१ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | ०१ | MS ( ORTHOPEDICS) / DNB ( ORTHOPEDICS) | AS PER NOTIFICATION .१४ . ०२ .२०२३<br>I) ASSOCIATE PROFESSOR IN THE SUBJECT FOR ४ YEARS IN A PERMITTED/APPROVED/RECOGNIZED MEDICAL COLLEGE/INSTITUTION<br><br>II) SHOULD HAVE AT LEAST TWO RESEARCH PUBLICATIONS (ONLY ORIGINAL PAPERS, META -ANALYSIS, SYSTEMATIC REVIEWS AND CASE SERIES THAT ARE PUBLISHED IN JOURNALS INDEXED IN MEDLINE, PUB MED CENTRAL INDEX, CITATION INDEX, EXPANDED EMBASE, SCOPUS, DIRECTORY OF OPEN EXCESS JOURNALS (DOAJ) WILL BE CONSIDERED ) THE AUTHOR MUST BE AMONGST FIRST THREE OR SHOULD BE THE CORRESPONDING AUTHOR.<br><br>III) SHOULD HAVE COMPLETED THE BASIC COURSE IN BIOMEDICAL RESEARCH FROM INSTITUTION (S) DESIGNATED BY NMC. |
| ०२ | बालरोगचिकीत्साशास्त्र | ०१ | M.D.(PEDIATRICS ) / DNB ( PEDIATRICS ) | |
| ०३ | त्वचा व गुप्त रोग | ०१ | M.D.(DERMATOLOGY AND VENEREOLOGY)/ M.D.(DERMATOLOGY, VENEREOLOGY AND LEPROSY)/ M.D.(DERMATOLOGY, INCLUDING VENEREOLOGY)/ M.D.(DERMATOLOGY INCLUDING VENEREOLOGY)/ LEPROSY)/ M.D.(MEDICINE WITH D.V.D.OR D.D.)/ DNB (DERMATOLOGY AND VENEREOLOGY) | |
| ०४ | स्त्रिरोग व प्रसुतीशास्त्र | ०२ | M.S.. OBSTERICS AND GYNECOLOGY/DNB (OBSTETRICS AND GYANAECOLOGY) | |
| | एकूण | ०५ | | |

टिप:

सदर जाहीरातीमधील नमुद पद संख्येत बदल करणे सदरची जाहीरात पुर्णत: रदद करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीतांनी स्वत:कडे राखुन ठेवला आहे.

महत्वाची टिप:-

१) उमेदवार हा भारताचा नागरीक व महाराष्ट्रातील रहीवासी असावा.

२) उमेदवाराचे वय : नियुक्ती वेळेस दि. १६/ १० /२०२३ रोजी कमाल ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३) प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करार पध्दतीने नियुक्तीसाठी त्या त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांन बरोबरच कोणत्याही वयोगटाचे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगानी विहीत केलेली आवश्यक अर्हता धारण करणारी खाजगी वा आन्य क्षेत्रातील उमेदवार ( बीगर सेवानिवृत्त) पात्र असतील.

४) मानधन:-

अ) सेवानिवृत्त अध्यापकांची करार पध्दतीने नियुक्ती झाल्यास त्यांना शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार दरमहा मानधन अनुज्ञेय असेल.

ब) खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार ( बिगर सेवानिवृत्त) यांना खालील नमुद प्रमाणे दरमहा मानधन अनुज्ञेय असेल.

| अ.क्र. | पद | विषय | दरमहा मानधन |
|---|---|---|---|
| १ | प्राध्यापक | चिकीत्सालयीन | १,८५,०००/- |
| २ | सहयोगी प्राध्यापक | चिकीत्सालयीन | १,७०,०००/- |

५) गुणांकन पध्दत:- जाहीराती सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मध्ये नमुद करण्यात आलेली आहे.

१) परिशिष्ट अमध्ये नमुद नुसार अनुक्र. १ ते ४ वरिल एकुण ८५ गुणांच्या आधारे तात्पुरती गुणवता यादी तयार करुन त्यानुसार उमेदवारांना प्रत्येक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखतीस पात्र ठरविण्यात येईल.

२) प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखती अंती १०० गुणांण पैकी किमान ४१ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांचाच करार तत्वावरील नियुक्ती करीता विचार केला जाईल.

नियम व अटी:-

१) करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत ३६४ दिवसांचा कालावधी या पैकी जे अगोदर घडेल इतका राहील.तथापी सदरहू पदावर नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी उमेवारांच्या पदस्थापनेत बदल करुन देण्यातचे अधिकार मा.आयुक्त यांना राहातील.

२) उमेदवाराचे कामकाज समाधान कारक नसल्यास गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्यांची नियुक्ती कोणत्याही पुर्व सुचनेशिवाय संपुष्टात येईल.

३) करार पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापीत मानकानुसार अध्यापन,रुग्णसेवा, व अधिष्ठाता यांनी नेमुण दिलेली विवक्षीत कामे पारपाडणे आवश्यक राहील.

४) वरिल प्रमाणे विहीत कामकाज पारपाडल्या नंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यावर विपरीत परिणाम होणार नाहीत याची दक्षता घेवून उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.

५) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणाताही हक्क राहाणार नाही. तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राहय धरला जाणार नाही.

६) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवाकालावधीत केवळ नैमितीक रजा अनुज्ञेय राहील.

७) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/ माहीती व आधार सामुग्री बाबत गोपणीयता पाळणे आवश्यक राहील.

८) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रधाण करता येणार नाहीत.

९) उमेदवारास नियुक्ती देण्यात आलयानंतर किमान १ एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा अशयाचे शपथपत्र उमेदवारास नियुक्ती पुर्वी सादर करणे बंधन कारक असेल असे शपथपत्र सादर करणाऱ्या उमेदवारासच करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षणिक स्तर चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थी हित विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिसिथतीत स्विकारल्या जाणार नाहीत.

१०) बिगर सेवानिवृत्त गटातून करार पध्दतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकाची नंतरच्या काळात नियुक्ती नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पुर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाही.

११) अर्जदाराणे संबंधीत पदासाठी शारिरीक दृष्टया पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.

१२) सदर जाहीरातीत नमुद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहीरात पुर्णत: रदद करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी स्वत:कडे राखुन ठेवला आहे.

१३) नमुद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणे बाबतचे सर्व अधिकार आधिष्ठातायांना राहातील.

१४) अर्जदारांने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१५) अर्जदाराचे नांव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या आंतर्गत नोंदणी केल्या बाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१६)उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.(मुलाखतीचे वेळापत्रक वेगळयाने कळविण्यात येईल)

१७) मुलाखतीला येतांना उमेदवारांनी ऑनलाईन सादर केलेल्या सर्व दस्ताऐवजांची मुळ कागदपत्रे सोबत आनणे बंधनकारक राहील.

(डॉ. एस. आर. वाकोडे)
अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णूपूरी, नांदेड